26 FEB 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे आयोजित शिव-महोत्सव कार्यक्रमात जीवनगौरव, कलागौरव, शिवसन्मान, स्नेहगौरव, शिव पुरस्कारार्थींसमवेत आजी-माजी विद्यार्थी, स्नेहमेळावा कृती समितीचे पदाधिकारी. (छाया : पप्पू आतार)

# शिव पुरस्कार सन्मानाने जबाबदारी वाढली

## डॉ. डी. टी. शिर्के; शिवमहोत्सव पुरस्कार वितरण, सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महोत्सव भरवून त्यात सातत्य राखणे आजच्या काळात अवघड झाले आहे. शिवमहोत्सवातील पुरस्कारार्थींची सन्मानाने जबाबदारी वाढली असून त्यांनी आदर्शवत कार्य करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीतर्फे विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित शिव महोत्सव कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी शिवाजीराव परुळेकर यांचा 'जीवनगौरव, गडचिरोलीचे पोलिस निरीक्षक अभिजित भोसले यांना 'कलागौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुनील पाटील, दिग्दर्शक यशवंत भालकर (स्नेहगौरव पुरस्कार) व अनाहूत लघुपट टीम (शिव अभिमान पुरस्कार), गायक निशांत गोंधळी, वादक प्रितेश हिवाळे, गायिका केतकी जमदग्नी, सुफी गायक जितेंद्र पाटील, नृत्य दिग्दर्शक चंद्रकांत पाटील (शिव-सन्मान) पुरस्कार प्रदान करण्यात आला. कॅप्टन नितीन सोनजे, सतीश पाटील, विजय पाटील, सदानंद माने, डॉ. नंदकुमार मोरे, मिलिंद सुरुलकर, रवींद्र भोसले यांना शिव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रास्ताविक सम्राट शिंदे यांनी केले. स्वागत डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. सत्यजित कोसंबी यांनी केले. आभार चांगदेव बंडगर यांनी मानले. यावेळी सरोज बिडकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दिग्दर्शक यशवंत भालकर, अरुण लाड, वसंतराव मुळीक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### सामाजिक प्रबोधन...

*शिव महोत्सव कार्यक्रमात श्वास अकादमीने 'बेटी बचाओ' थीमवर सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांचे प्रबोधन केले. त्यानंतर मंगळागौर नृत्य, सँड आर्ट, बिट बॉक्सिंग व मराठी रॅपवर तरुणाई जल्लोष केला. ये मेरा दिल, मुंगळा, चुरा लिया है या गीतांवर युवक-युवतींना ठेका धरला. शिवराय गीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गीताने विद्यार्थ्यांना स्फूर्ती, प्रेरणा दिली.*

26 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरस्काराने जबाबदारीही वाढते

## डॉ. डी. टी. शिर्के : शिवमहोत्सवात मान्यवरांचा गौरव

कोल्हापूर, ता. २५ : पुरस्कार मिळणे हा जीवनातील आनंदाचा क्षण असला, तरी पुरस्कार मिळाल्याने जबाबदारीही तितकीच वाढते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती व स्पेक्ट्रम ॲकॅडमीतर्फे आयोजित शिवमहोत्सवात ते बोलत होते. या वेळी शिवाजीराव परुळेकर यांना जीवनगौरव, तर पोलिस निरीक्षक अभिजित भोसले यांना कलागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लोककला केंद्रात त्याचे आयोजन केले होते. डॉ. शिर्के म्हणाले, "शिवमहोत्सवातून तरुणाईला ऊर्जा देण्याचे काम केले जाते. पुरस्काराच्या माध्यमातून विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली जाते. पुरस्कार मिळाल्यानंतर पुरस्कारकर्त्यांनी त्यांच्या क्षेत्रात झपाटून काम करण्याची आवश्यकता असते. ज्यामुळे पुढची पिढी त्यांचा आदर्श घेऊन वाटचाल करेल." या वेळी कॅप्टन डॉ. नितीन सोनजे, सतीश पाटील, विजय पाटील, सदानंद माने, डॉ. नंदकुमार मोरे, मिलिंद सुरूलकर, रवींद्र भोसले यांना शिवपुरस्काराने, निशांत गोंधळी, प्रितेश हिवाळे, केतकी जमदग्नी, जितेंद्र पाटील, चंद्रकांत पाटील यांना शिवसन्मान, सुनील पाटील, दिग्दर्शक यशवंत भालकर यांना स्नेहगौरव, तर अनाहूत लघुपट टीमला शिव अभिमान पुरस्काराने गौरविण्यात आले. या प्रसंगी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव मुळीक, अरुण लाड, प्रसाद लाड, रोहित पाटील, मंदार पाटील, चांगदेव बंडगर, नितीन पाटील, प्रवीण साळुंखे, विश्वास माने, मंजित माने, आनंद पाटील उपस्थित होते. डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी स्वागत केले. सम्राट शिंदे यांनी प्रास्ताविक केले.



कोल्हापूर : शिवमहोत्सवात पुरस्कारप्राप्त व्यक्तींसमवेत डावीकडून सरोज बीडकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, यशवंत भालकर, शिवाजीराव परुळेकर, डॉ. नितीन सोनजे, सुनील पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अभिजित भोसले, अरुण लाड, वसंतराव मुळीक, प्रसाद लाड, रोहित पाटील, मंदार पाटील, डॉ. प्रवीण कोडोलीकर.
(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

### सांस्कृतिक कार्यक्रमास दाद

**पुरस्कार वितरणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. त्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2018
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवमहोत्सवात शिवाजीराव परुळेकर यांना जीवनगौरव तर पोलिस अधिकारी गायक अभिजित भोसले यांना शिवकला पुरस्कार तसेच अन्य कलाकारांना शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित केले. पुरस्कार वितरण सोहळ्यावेळी प्र -कुलगुरु डॉ.टी.शिर्के, आदी मान्यवर.

# पुरस्कार सामाजिक जबाबदारी वाढवतात

## प्र-कुलगुरु डॉ. डी.टी शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात शिवमहोत्सव सोहळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजी माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठाच्या वतीने गेल्या १४ वर्षापासून शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या महोत्सवाचे सातत्य टिकवले आहे. महोत्सवात दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांने पुरस्कारकर्त्यांच्या आनंदात भर पडते. याबरोबरच पुरस्कार सामाजिक जबाबदारी वाढवतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

आजी माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठ आणि स्पेक्ट्रम अकॅडमी (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी शिवाजी विद्यापीठांत १५ वा शिवमहोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी समाजसेवेतील योगदानाबद्दल यंदाचा जीवनगौरव पुरस्कार शिवाजीराव परुळेकर यांना, तर खाकी वर्दीतला गायक म्हणून पोलीस अधिकारी अभिजित भोसले यांना त्यांच्या गायन कलेसाठी शिवकला गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेक गुणवंतांना शिवपुरस्काराने गौरविले. यावेळी प्र -कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे, यशवंत भालकर, शिवाजीराव परुळेकर, डॉ. प्रवीण कोडोलीकर, अभिजित भोसले, अरुण लाड आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार वितरणानंतर महोत्सवाची सुरुवात फिल्मफेअर ॲवार्ड विजेता लघुपट 'अनाहूत''च्या सादरीकरणाने झाली. यानंतर गायक अभिजित भोसले, सारेगमपा फेम कोमल जनकिया, गायक निशांत गोंधळी, केतकी जमदग्नी, सूरज नाईक, मेलोडिका वादक प्रितेश हिवाळे, सार्थक क्रिएशनचे सागर बगाडे, हास्यसम्राट फेम के.पंडित, आणि नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील व ओंकार रोटे यांच्या कलाकारीने शिवमहोत्सवाची रंगत वाढवली. कॅप्टन डॉ.नितीन सोनजे, सतीश पाटील, विजय पाटील, सदानंद माने, डॉ. नंदकुमार मोरे, मिलिंद सुरुलकर, रवींद्र भोसले यांना शिवपुरस्काराने तर गायक आणि निर्माता निशांत गोंधळी, संगीतकार, मेलोडिका प्रीतेश हिवाळे, गायिका केतकी जमदग्नी, सुफी गायक जितेंद्र पाटील, नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील यांना शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक सागर बगाडे यांनी केले. सूत्रसंचालन अभिजित कोसंबी यांनी केले. आभार डॉ. सरोज बिडकर यांनी मानले. डॉ. प्रवीण साळुंखे, सम्राट शिंदे, सागर नलवडे, अनंत पाटील, चंद्रकांत कुरणे, नितीन पाटील, सागर चव्हाण, विश्वास माने, योगेश माने आदी उपस्थित होते.

26 FEB 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महोत्सवामुळे युवकांत सामाजिक भान'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'गेल्या अनेक वर्षांपासून आयोजित केल्या जाणाऱ्या शिवमहोत्सवामुळे तरुणांत सामाजिक भान वाढत असून यामुळे सांस्कृतिक चळवळीला बळ मिळत आहे. सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या लोकांना शिवपुरस्काराने सन्मानित केले जात असल्याने त्यांच्या जबाबदारीत वाढ होत आहे,' प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ आजी माजी विद्यार्थी कृती समिती व स्पेक्ट्रम अॅकॅडमी(नाशिक) यांच्यावतीने आयोजित १५ व्या शिव महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मनोरंजानाचा कार्यक्रम झाला.

डॉ. शिर्के म्हणाले, आजी- माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने हा महोत्सव दरवर्षी आयोजित केला जात असून गेल्या १५ वर्षांपासून ही परंपरा अखंडित राहिली आहे. हा महोत्सव आजूबाजूच्या जिल्ह्यात पोहचला असून त्याची ख्याती सर्वदूर पोहचते आहे. कला क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या तरुणांसाठी हा महोत्सव म्हणजे हक्काचे व्यासपीठ आहे. समाजात चांगले काम करणाऱ्या माणसांचा गौरव या माध्यमातून होत असल्याने हा महोत्सव महत्वपूर्ण ठरत आहे.'

अर्जुन टाकळकर





शिवाजी विद्यापीठातील शिव महोत्सवात जीवन गौरव पुरस्काराने शिवाजी परुळेकर यांना सन्मानित करताना प्र. कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यावेळी शिवमहोत्सव समितीचे सभासद आणि मान्यवर उपस्थित होते. शिवमहोत्सव सांस्कृतिक कार्यक्रमात गणेश विश्वरूप दर्शन कला सादर करताना कलाकार

यावेळी कॅप्टन डॉ. नितीन सोनजे, सतीश पंडितराव पाटील, विजय पाटील, सदानंद माने, डॉ. नंदकुमार मोरे, मिलिंद मधुसूदन, रवींद्र भोसले यांना शिवपुरस्काराने तर गायिका केतकी जमदग्नी, सुफी गायक जितेंद्र पाटील, नृत्य दिग्दर्शक चंद्रकांत पाटील गायक निशांत गोंधळी, संगीतकार वादक प्रीतेश हिवाळे यांना शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक सागर बगाडे, सूत्रसंचालन अभिजित कोसंबी, यांनी केले तर आभार सरोज बिडकर यांनी मानले

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात फिल्मफेअर पुरस्कार विजेत्या अनाहूत या लघुपटाने झाली. तुफानी रंगलेल्या या कार्यक्रमात पोलिस अधिकारी गायक अभिजित भोसले, सारेगामा फेम कोमल जनकिया, गायक गोंधळी, केतकी जमदग्नी, सूरज नाईक, संगीतकार हिवाळे, सार्थक क्रिएशनचे सागर बगाडे, हास्यसम्राट के. पंडित, नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील व ओंकार रोटे यांनी कला सादर केल्या.

## परुळेकर यांना जीवनगौरव

समाज कार्यातील योगदानाबद्दल यंदाचा जीवनगौरव पुरस्कार शिवाजीराव परुळेकर यांना देण्यात आला. माणसातला कलाकार शोधणे हा या महोत्सवाच्या आयोजनामागील हेतू असून पोलिस अधिकारी अभिजित भोसले यांना गायन कलेसाठी शिव- कलागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## शिट्ट्या, टाळ्या आणि जयघोष

जय भवानी, जय शिवाजी व भारत माता की जय या घोषणासह टाळ्या आणि शिट्ट्यांनी कलाकारांना तरुणाई प्रतिसाद देत होती. 'गणेश विश्वरूप दर्शन' या नृत्याने उपस्थितांची वाहवा मिळविली. सूरज नाईक याच्या 'मेरे रश्के कमर' या गीत गायनाला उपस्थितांनी उभा राहत दाद दिली.

# पुरस्कार सामाजिक जबाबदारी वाढवतात

## पंधराव्या शिवमहोत्सवात प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : आजी-माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठ आणि स्पेक्ट्रम अॅकॅडमी (नाशिक), कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंधराव्या शिवमहोत्सवातील जीवन गौरव पुरस्काराने शिवाजीराव परुळेकर यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यशवंत भालकर, डॉ. प्रवीण कोडोलीकर, अभिजित भोसले आदी. (छाया : एस. अली)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
गेल्या पंधरा वर्षांतील शिवमहोत्सवाचा आनंद वर्षागणिक वाढतच असून, अत्यंत नेटके संयोजन होत आहे. या महोत्सवात दिल्या जाणाऱ्या पुरस्काराने पुरस्कर्त्यांच्या आनंदात मोठी भर पडत असली तरी पुरस्कार सामाजिक जबाबदारी वाढवतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

आजी-माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठ आणि स्पेक्ट्रम अॅकॅडमी (नाशिक), कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंधराव्या शिवमहोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यशवत भालकर, डॉ. प्रवीण कोडोलीकर, अभिजित भोसले, शिवाजीराव परुळेकर, अरुण लाड यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. प्रवीण कोडोलीकर यांच्या पुढाकाराने आजी-माजी विद्यार्थी समितीने आयोजित केलेला हा शिवमहोत्सव अधिक लोकप्रिय झाला आहे. या महोत्सवाने गेली पंधरा वर्षे कोल्हापूरच्या प्रबोधनपर सांस्कृतिक जीवनावर तसेच रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. अतिशय शिस्तप्रिय पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवाने विद्यापीठाचा नावलौकिक सर्वदूर पसरला आहे. या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे शिवाजी विद्यापीठात आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने दरवर्षी वेगवेगळ्या पुरस्कारांचे वितरण केले जाते. यंदाचा जीवन गौरव पुरस्कार शिवाजीराव परुळेकर यांना त्यांच्या समाजसेवेतील कार्यासाठी, योगदानासाठी, खाकी वर्दीतला पोलीस अधिकारी म्हणून अभिजित भोसले यांना त्यांच्या गायन कलेसाठी शिव-कलागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याचबरोबर शिवपुरस्कारानेही अनेक गुणवंतांना सन्मानित करण्यात आले आहे. यामुळे पुरस्कारप्राप्त व्यक्तींचा आनंद द्विगुणित झाला असला तरी त्यांच्या सामाजिक जबाबदारीत वाढ झाली आहे.

नृत्य, गायन अशा कलागुणांच्या उधळणीत पार पडलेल्या या शिवमहोत्सवाची सुरुवात पुरस्कार वितरणानंतर फिल्मफेअर अॅवॉर्ड विजेता लघुपट अनाहूतने झाली. सांस्कृतिक कार्यक्रमात सामान्य माणसात दडलेला खाकी वर्दीतला पोलीस अधिकारी गायक अभिजित भोसले, सारेगमपा फेम कोमल जनकिया, गायक निशांत गोंधळी, केतकी जमदग्नी, सूरज नाईक, मेलोडिका वादक प्रीतेश हिवाळे आणि सार्थक क्रिएशनचे सागर बगाडे, हास्यसम्राट फेम के. पंडित व नृत्य दिग्दर्शक चंद्रकांत पाटील व ओंकार रोटे यांच्या कलाकारीने तर शिवमहोत्सवाची उंची वाढवली. कॅप्टन डॉ. नितीन सोनजे, सतीश पंडितराव पाटील, विजय गोविंद पाटील, सदानंद श्रीधर माने, डॉ. नंदकुमार विष्णू मोरे, मिलिंद मधुसूदन सुरुलकर, रवींद्र भोसले यांना शिव पुरस्काराने, तर सुप्रसिद्ध गायक, निर्माता निशांत गोंधळी, संगीतकार प्रीतेश हिवाळे, सुप्रसिद्ध गायिका केतकी जमदग्नी, सुफी गायक जितेंद्र पाटील, नृत्य दिग्दर्शक चंद्रकांत पाटील यांना शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक सागर बगाडे यांनी केले. अभिजित कोसंबी याने सूत्रसंचलन केले, तर आभार डॉ. सरोज बिडकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्रवीण साळुंखे, सम्राट शिंदे, सागर नलवडे, अनंत पाटील, चंद्रकांत कुरणे, नितीन पाटील, सागर चव्हाण, विश्वास माने, योगेश माने आदींनी परिश्रम घेतले.

26 FEB 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डी. टी. शिर्के : शिवमहोत्सवात शिवाजी परुळेकर यांना 'जीवनगौरव'

# सन्मान जबाबदारी वाढविणारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवमहोत्सवातील सन्मान हा आनंदात भर टाकणारा आहे. हा सन्मान पुरस्कर्त्यांवरील सामाजिक जबाबदारी वाढविणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी रविवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समिती आणि स्पेक्ट्रम अकॅडमीतर्फे आयोजित १५व्या शिवमहोत्सवातील पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील लोककला केंद्र सभागृहातील या कार्यक्रमास 'स्पेक्ट्रम अकॅडमी'चे सुनील पाटील, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अरुणअण्णा लाड, दिग्दर्शक यशवंत भालकर, शिवमहोत्सवाचे संकल्पक डॉ. प्रवीण कोडोलीकर प्रमुख उपस्थित होते. सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जनता दल (सेक्युलर)चे राज्य महासचिव शिवाजीराव परुळेकर यांना 'जीवनगौरव', तर पोलीस अधिकारी अभिजित भोसले यांना 'शिव-कलागौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव मुळीक, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रसाद लाड, रोहित पाटील, मंदार पाटील, आयोजक समिती सचिव डॉ. चांगदेव बंडगर, प्रवीण साळुंखे, सम्राट शिंदे, सागर नलवडे, अनंत पाटील, चंद्रकांत कुरणे, नितीन पाटील, सागर चव्हाण, विश्वास माने, योगेश माने उपस्थित होते. सागर बगाडे यांनी स्वागत केले. सरोज बिडकर यांनी मानपत्राचे वाचन केले. सत्यजित कोसंबी यांनी सूत्रसंचालन केले.



नसीर अत्तार

कोल्हापुरात रविवारी शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे आयोजित शिवमहोत्सवामध्ये जनता दल (सेक्युलर)चे राज्य महासचिव शिवाजीराव परुळेकर यांना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी डावीकडून यशवंत भालकर, नितीन सोनजे, सुनील पाटील, अभिजित भोसले, अरुण लाड, शीला परुळेकर, वसंतराव मुळीक, मंदार पाटील, प्रवीण कोडोलीकर, चांगदेव बंडगर उपस्थित होते.

## पुरस्कार विजेते

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण झाले. यामध्ये विद्यापीठातील प्रशासकीय सेवक डॉ. नितीन सोनजे, सतीश पाटील, विजय पाटील, सदानंद [illegible]ने, डॉ. नंदकुमार मोरे, मिलिंद सुरुलकर, शहाजी महाविद्यालयाचे रवींद्र भोसले (शिवपुरस्कार), गायक निशांत गोंधळी, संगीतकार प्रीतेश हिवाळे, गायिका केतकी जमदग्नी, सुफी गायक जितेंद्र पाटील, नृत्यदिग्दर्शक चंद्रकांत पाटील (शिव सन्मान पुरस्कार), 'अनाहूत' लघुपटाची टीम (शिव अभिमान पुरस्कार), सुनील पाटील, यशवंत भालकर (स्नेहगौरव पुरस्कार) यांना सन्मानित करण्यात आले.

26 FEB 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : १) शिव महोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात गणेश विश्वरूप दर्शन नृत्याने झाली. २) शिवराज्याभिषेक सोहळाही दिमाखात सादर झाला. यावेळी तरुणाईने 'जय भवानी...जय शिवाजी...' अशा गगनभेदी घोषणा दिल्या. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 FEB 2018

लोकमत

# शिक्षणात गुणात्मक वाढ महत्त्वाची

## डी. टी. शिर्के : 'फास्टा' आयोजित शिक्षण परिषदेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक वाढीसह गुणात्मक वाढ महत्त्वाची आहे. वर्गात घेतलेले ज्ञान व्यवहारात उपयोगी ठरावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी रविवारी येथे केले.

फुले-आंबेडकर-शाहू टीचर्स असोसिएशनतर्फे (फास्टा) आयोजित शिक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. येथील राजर्षी शाहू स्मारक भवनमधील या कार्यक्रमास इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनचे प्रा. मर्झबान जाल प्रमुख उपस्थित होते. 'फास्टा'चे अध्यक्ष प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांचे यावेळी बीजभाषण झाले. अध्यक्षस्थानी 'फास्टा'चे जनरल सेक्रेटरी प्रा. डॉ. भरत नाईक होते.

डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, चांगली गुणवत्ता आणि कौशल्य असेल, तर नोकरी मिळू शकते. ते लक्षात घेऊन पदवीधर विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर नेता येईल का? त्यादृष्टीने ज्ञान देता येईल का? याचा विचार होणे आवश्यक आहे. सार्वजनिक पैसा हा समाजहितासाठी वापरला पाहिजे.



कोल्हापुरात रविवारी फुले-आंबेडकर-शाहू टीचर्स असोसिएशनतर्फे (फास्टा) आयोजित शिक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून प्रा. गौतमीपुत्र कांबळे, मर्झबान जाल, मिलिंद वडमारे, भरत नाईक उपस्थित होते.

### परिषदेतील ठराव

- शिक्षणाचे कंपनीकरण थांबवावे.
- सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात भारतीय संविधानाचा समावेश करावा.
- सर्व विद्याशाखातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी एस.सी., एस.टी., एन.टी., ओबीसी प्रवर्गासाठीची असणारी शिष्यवृत्ती, फ्रीशीपची तरतूद चालू ठेवावी.
- शिवाजी विद्यापीठामध्ये बसवाण्णा अध्यासन सुरु करावे.

### विविध विषयांवरील निबंधांचे सादरीकरण

उद्घाटनानंतर परिषदेतील सत्रात प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील (विषय : इतिहासाचे विकृतीकरण), प्रा. पी. एस. कांबळे (भारतातील उच्च शिक्षणाचे भवितव्य), प्रा. सुभाष दगडे (भारतीय संविधान आणि शिक्षण) आणि प्रा. अनिल घस्ते यांनी निबंधांचे सादरीकरण केले. अध्यक्षस्थानी प्रा. जे. व्ही. सरतापे होते.

प्रा. गौतमीपुत्र कांबळे म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर यांनी शिक्षणाची कृतिशील चळवळ सुरु केली. त्यांनी धार्मिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप केला, या व्यवस्थेला छेद दिला. शिक्षण, आरोग्याचे खासगीकरण होऊ नये. प्रा. मर्झबान जाल म्हणाले, जगात संघर्ष सुरु असून, अशा स्थितीत स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे महत्त्वाची आहेत. माणूस घडविण्याची गरज आहे. शिक्षणातून वैश्विक मानवता निर्माण झाली पाहिजे. या कार्यक्रमास प्रा. विकास मिणचेकर, राजू सावंत, ज्ञानराजा चिगळीकर, घन:शाम कांबळे, राहुल कांबळे, आप्पा केंगार, विनोद कांबळे, प्रदीप गायकवाड, आदींसह कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील प्राध्यापक उपस्थित होते. स्वागताध्यक्ष प्रा. मिलिंद वडमारे यांनी स्वागत केले. प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांच्या मार्गदर्शनाने परिषदेचा समारोप झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2018
पुण्यनगरी

# शिक्षणात गुणात्मक वाढ महत्त्वाची : डॉ. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिक्षण क्षेत्रात संख्यात्मक वाढीसह गुणात्मक वाढ महत्त्वाची आहे. वर्गात घेतलेले ज्ञान विद्यार्थ्यांस त्याच्या जीवनात उपयोगी ठरावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

फुले-आंबेडकर-शाहू टीचर्स असोसिएशनतर्फे (फास्टा) आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी 'फास्टा'चे जनरल सेक्रेटरी प्रा. भरत नाईक होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, चांगली गुणवत्ता आणि कौशल्य असेल, तर नोकरी मिळू शकते. ते लक्षात घेऊन पदवीधर विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर नेता येईल का? त्या दृष्टीने ज्ञान देता येईल का? याचा विचार होणे आवश्यक आहे. सार्वजनिक पैसा हा समाजहितासाठी वापरला पाहिजे. प्रा. गौतमीपुत्र कांबळे म्हणाले, फुले-शाहू-आंबेडकर यांनी शिक्षणाची कृतिशील चळवळ सुरू केली. त्यांनी धार्मिक व्यवस्थेमध्ये हस्तक्षेप केला. या व्यवस्थेला छेद दिला. या चळवळीचे आपण सर्व परिपाक आहोत. शिक्षण, आरोग्याचे खासगीकरण होऊ नये. प्रा. मर्झबान जाल म्हणाले, जगात संघर्ष सुरू असून, अशा स्थितीत स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे महत्त्वाची आहेत. माणूस घडवण्याची गरज आहे. शिक्षणातून वैश्विक मानवता निर्माण झाली पाहिजे. शिक्षणाने जग बदलले पाहिजे.

## परिषदेतील ठराव

■ सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात भारतीय संविधानाचा समावेश करावा. ■ शिक्षणाचे कंपनीकरण थांबवावे. ■ शिवाजी विद्यापीठामध्ये बसवाण्णा अध्यासन सुरू करावे. ■ सर्व विद्याशाखांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी एस.सी., एस.टी., एन.टी., ओ.बी.सी. प्रवर्गासाठीची असणारी शिष्यवृत्ती, फ्रीशिपची तरतूद चालू ठेवावी.

26 FEB 2018

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर ‘विवेकानंद’, ‘रयत’ला प्रतिनिधित्व नाही

## अधिसभेची आज बैठक; चार गटांसाठी होणार निवडणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेतील चार गटांसाठी आज, सोमवारी निवडणूक होणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभेवेळी (सिनेट) संबंधित निवडणूक होईल. मात्र, यावर्षी व्यवस्थापन परिषदेवर ‘संस्था प्रतिनिधी’ गटातून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेला प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांची निवडणूक यावर्षी विद्यापीठ विकास आघाडीने शिक्षणक्षेत्रांतील विविध संघटनांना एकत्रित करून लढवत बाजी मारली. या विकास आघाडीमध्ये प्राचार्य असोसिएशन, शिक्षणसंस्था संघटना, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेसह (अभाविप) सात संघटनांचा समावेश आहे. व्यवस्थापन परिषदेतील प्राचार्य, संस्था प्रतिनिधी, शिक्षक आणि नोंदणीकृत पदवीधर या गटांतील प्रत्येक दोन अशा एकूण आठ जागांसाठी निवडणूक होणार आहे. त्यातील प्राचार्य गटासाठी प्राचार्य असोसिएशनने आपले प्रतिनिधी दिले आहेत. शिक्षक गटात अभाविपने एक जागा मिळविली आहे. संस्था प्रतिनिधी गटातून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव इच्छुक होत्या; पण, त्यांना काही कारणास्तव संधी मिळाली नाही. रयत शिक्षण संस्थेचे प्रतिनिधीत्व दिसत नाही.

### निवडीचा सर्वानुमते निर्णय



विविध अधिकार मंडळांची निवडणूक असो की, समितींवरील सदस्य निवडी यासाठी विद्यापीठ विकास आघाडीच्या कार्यकारिणीतर्फे सर्वानुमते निर्णय घेतला जातो. त्यात आघाडीअंतर्गत असलेल्या प्रत्येक संघटनेशी चर्चा केली जाते. व्यवस्थापन परिषदेच्या निवडणुकीतील उमेदवारी निवडीबाबत देखील सर्वानुमते निर्णय घेतला आहे, असे विद्यापीठ विकास आघाडीचे सचिव एल. जी. जाधव यांनी सांगितले. या निर्णयामध्ये विवेकानंद आणि रयत शिक्षण संस्थेचा देखील समावेश आहे. विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणामध्ये ‘विवेकानंद’ आणि ‘रयत’ला संधी दिली असून यापुढे देखील त्यांना संधी दिली जाईल, असे सचिव जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2018

सकाळ

# 'ऊर्जा'च्या मोफत सन्मानिका आजपासून

कोल्हापूर, ता. २५ : 'सकाळ माध्यम समूह' आणि शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवार (ता. ३)पासून सलग चार दिवस फिझिंगा-संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' हा कार्यक्रम होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत ही पर्वणी सर्वांनाच अनुभवता येणार आहे. सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून, उद्या (ता. २६)पासून मोफत सन्मानिका 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरातील कार्यालयात उपलब्ध आहेत.

यंदाच्या मुक्त संवादात प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे, भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री शेखर नाईक, रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या नीलिमा मिश्रा, सॉफ्टवेअर तज्ज्ञ राकेश देशमुख,




प्रसिद्ध जाहिरातकार राज कांबळे, साताऱ्याचे आयपीएस संदीप पाटील, विमान निर्मितीतील मराठी उद्योजक कॅप्टन अमोल यादव यांच्याशी मुक्त संवाद होणार आहे. चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस् इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, श्री ट्रॅव्हल्स सहप्रायोजक, तर हॉटेल सयाजी हॉस्पिटॅलिटी पार्टनर, रेडिओ सिटी रेडिओ पार्टनर आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क : सूरज जमादार (९५५२५८१९१८).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात उद्या 'मराठीची शिदोरी'

कोल्हापूर टाइम्स टीम

राज्य सरकारचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मंगळवारी (ता. २७) सायंकाळी सहा वाजता 'मराठीची शिदोरी' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शाहू स्मारक भवन येथे होणाऱ्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणून लाभणार असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'यावर्षी नृत्य, नाट्य व संगीत यांच्या माध्यमातून मराठी परंपरेचे दर्शन घडवणाऱ्या 'मराठीची शिदोरी' कार्यक्रम आयोजित केला आहे.

कार्यक्रमामध्ये अभिनेते जितेंद्र जोशी, विजय कदम, अभिनेत्री समीरा गुजर-जोशी, गायक नंदेश उमप, सारेगमप विजेते नचिकेत लेले व धनश्री देशपांडे, नीशा पारसनीस, आदी सहभागी होणार आहे. लावणीसम्राज्ञी छाया खुटेगावकर कला सादर करणार आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह कोल्हापूर उच्चशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. अजय साळी प्रमुख पाहुणे असणार आहेत.'

मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस म्हणाले, 'मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी विभागाच्या वतीने निबंधलेखन, काव्यवाचन, कवी संमेलन, मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयक सिद्धांताचा पुनर्विचार या विषयावर चर्चासत्र, विकीपीडिया नोंदलेखन कार्यशाळा, आरोग्याची भाषा व भाषेचे आरोग्य या विषयावर परिसंवाद, मराठी विज्ञानकथा लेखन कार्यशाळा आदी उपक्रम होतील.'

पत्रकार परिषदेस उपकुलसचिव विलास सोयम, मराठी अधिविभागाचे डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 FEB 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची आज बैठक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परीषदेच्या सदस्य निवडीबाबत सोमवार (२६) रोजी सिनेटची बैठक होणार आहे. या बैठकीस पात्र सदस्यांमधून व्यवस्थापन परिषद सदस्यांची निवड केली जाणार आहे. तसेच विधानसभा सभापती नियुक्त अधिसभा सदस्य आमदार चंद्रदीप नरके व आमदार अमल महाडिक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलची निवडणूक मंगळवार (२७) रोजी होणार आहे. अध्यक्षपदासाठी दोन सदस्य व सचिव पदासाठी पाच सदस्यांमध्ये लढत होईल. सर्व सदस्य विद्यापीठ विकास आघाडीचे असल्याने आघाडीच दोन्हीकडे बाजी मारणार असल्याचे स्पष्ट असले तरी आज यावर शिक्कामोर्तब होणार आहे.

26 FEB 2018

सकाळ

# विज्ञान कथालेखन कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग, मराठी विज्ञान परिषदेतर्फे सहा ते आठ मार्च कालावधीत शिवाजी विद्यापीठात विज्ञान कथालेखनावर कार्यशाळा होत आहे. यासाठी विज्ञान जगतातील मान्यवर कथा लेखक मार्गदर्शनासाठी येत आहेत. यामध्ये डॉ. बाळ फोंडके, प्रा. यशवंत देशपांडे, प्रा. माधुरी शानबाग, प्रा. मोना चिमोटे, प्रा. संजय ढोले, प्रा. शिरीष देशपांडे यांचा समावेश आहे.

बडोदा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते सहा मार्चला उद्घाटन होईल, अशी माहिती मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ. पां. देशपांडे, कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष शिवाजीराव पवार यांनी पत्रकाद्वारे दिली.